# प्रस्तावना

संगणक/माहिती तंत्रज्ञान आबालवृद्धांवर जागतिक स्तरावर मोठा परिणाम करत आहे. भारताचा ह्या जागतिक यशात मोठा वाटा आहे व अर्थव्यवस्थेच्या मजबुतीत संगणक उपयोगाचा मोठा वाटा असणार आहे. माहिती तंत्रज्ञान / बी.पी.ओ., भारतीय युवा पिढीला अनेक स्तरावर रोजगार निर्माण करत आहे. मी स्वत: संगणकाचा वापर करून खेडोपाडी 'साक्षरता' निर्माण करायचा प्रयोग करत आहे.

पुणे हे संगणक क्षेत्रात एक मोठी बाजारपेठ बनत आहे. पुण्यातून रु. ८००० कोटीची संगणकप्रणाली निर्यात होत आहे. पुण्यातील दीपक शिकारपूर ह्या संगणकतज्ज्ञाने संगणक तंत्रज्ञान मराठीत आणण्याचे मोठे काम केले आहे. कै. देवांग मेहता हे त्यांचे स्फूर्तिस्थान.

दीपकच्या 'सायबर झंझावात' ह्या पुस्तकाला माझ्या हार्दिक शुभेच्छा !

— **डॉ. फकिरचंद कोहली**

भारतीय संगणक उद्योगाचे जनक